# १. आईचे डोळे

गुणवत्तायादीत चमकलेल्या सलीलचं अभिनंदन करण्यासाठी फुलांचा गुच्छ घेऊन त्याचं घर शोधत मी गेलो. घर शोधता शोधता प्रश्न पडला इतक्या झोपडपट्टीत राहतो सलील? राहतो किती नीटनेटका. त्याच्या व्यक्तिमत्त्वातील टापटिपीवरून त्याच्या घराचा बांधलेला अंदाज साफ कोसळला होता. गटारांची अनेक जाळी धडपडत ओलांडत एका फळकुटाच्या झोपडीजवळ गेलो. 'इथंच तो राहतो' म्हणून कुणीतरी सांगितलं. काळोखातून प्रकाश बाहेर यावा तसा सलील माझ्या आवाजानंच बाहेर आला 'सर?' आत गेलो. 'अभिनंदन...' गुच्छ देत म्हटलं. मला जायला तसा तीनचार दिवस उशीरच झाला होता. अभिनंदनाची पहिली वर्दळ थांबून आता रूटिन सुरू झालं होतं. गुणवत्तायादीत आलेल्या मुलाचं हे घर? सलीलनं अभ्यास कुठे केला असेल? भोवतीच्या रेल्वेच्या आणि लाऊडस्पीकरच्या सततच्या गदारोळात त्याने अभ्यास कुठे केला असेल? त्याचं पुन:पुन्हा अभिनंदन करताना मनातल्या मनात ते काळोखे कोपरे पाहत स्वत:लाच विचारीत होतो.

'सर, खूप खूप बरं वाटलं. खरं तर तुम्ही घरी आलायत् हे खरंच वाटत नाहीये. सावरलेलो नाहीये मी! चहा करतो.' तो स्टोव्हला पंप मारू लागला.

'सलील, राहू दे. आपण बाहेर घेऊ.'

'तुम्ही काळजी करू नका. चहा मी उत्तम करतो. कोळसेवाडीत कॅन्टीन चालवतो. फक्त चहाचं.'

चहाच्या वाफांनी वातावरण भारलं.

'घरात दुसरं कुणी?'

'ताई आहे. टायपिंगच्या क्लासला गेलीय. वडील किराणा दुकानात हमाल आहेत.'

'आई?'

'आई? नाही.'

रेंगाळलेली स्तब्धता कशी प्रवाही करावी या विचारानं मी गोंधळलो.

चहा त्यानं खरंच उत्कृष्ट केला होता. जीव ओतून!

'सलील, मार्गदर्शन व्याख्यानमालेत येत होतास. भेटत होतास. उत्तरपत्रिका पुन:पुन्हा तपासून घेत होतास. पण तेव्हा तुझ्याकडे पाहून...'

'सर, माणसाची परिस्थिती दिसलीच पाहिजे का? आपले कष्ट, आपलं जगणं बघून कुणीतरी 'अरेरे...' करून निघून जाणं, त्यानं काय होतं? आताही खूप बक्षिसं मिळालीत. पण ती पुरणार आहेत का? पुढचं शिकायला कष्ट करावेच लागणार. टीव्हीवाले आले, निघून गेले. मोठ्या क्लबचे अध्यक्ष गाडी आत येत नाही म्हणून उतरून आतही नाही आले. सर, परिस्थिती माणसाला आहे त्यापेक्षा मोठं करते.'

सलीलची चमक गुणवत्तायादीपुरती उरली नव्हती. वाक्यावाक्यात... डोळ्यांतून चमकत होती.

'कुठून शिकलास हे सगळं?'

'भोवतीच्या मुलांकडून.'

'म्हणजे?'

'ती नुसता टाइमपास करतात. बहुतेक नापास होतात. मग रात्री जुगार! दहिहंडी, गणपती, होळी, नवरात्र हा त्यांचा उत्पन्नाचा मार्ग. पितात, भांडतात! तेव्हा ठरवलं आपण तसं व्हायचं नाही. याच वर्षी नाही, सातवीतच ठरवलं. सातवीतच आई गेली माझी. इथल्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये. साध्या न्यूमोनियानं.'

'बदलेल सारं...'

'बदलतंच आहे, सर. गरिबीचा विचार करायला वेळच कुठे आहे?'

तसे आपले डोळे क्वचितच भरून येतात. काळजाशी दडलेले अश्रू क्वचित पापणीच्या काठावर येतात.

माझ्या आणि अनेक कॉलेजेस्‌च्या भोवती चकाट्या पिटत साऱ्या वेळेचा कचरा करणारी असंख्य मुलं आठवली. रानगेंड्याप्रमाणे फटफट्या घेऊन उधळणारी, देणग्याफी देऊन वर्गात बसलं तर 'पाप' मानणारी असंख्य मुलं!

त्यांच्याच वयाचा सलील! असेही अनेक चेहरे झपकन् तरळून गेले.

'सलील, एकदा माझ्या वर्गात ये. मुलांशी गप्पा मारायला.'
'सर, एवढं मोठं करू नका मला. असे काबाडकष्ट करून शिकणारेही अनेक आहेत. सर, वॉचमन मनात जागा असला की कुणी सांगावं लागत नाही. आपण कुठल्या परिस्थितीत जगतो, आपले पालक रक्ताचं पाणी करून आपल्याला कसं शिकवतात, याची आठवण सतत जागी असेल ना, तर शाळेच्या वर्गातल्या अभ्यासानंही मार्कस् मिळतात. क्लासेसबिसेस चैन झोपाळू मुलांसाठी'
रिक्षापर्यंत सलील बरोबर आला. तिथेही बोलत राहिलो बराच वेळ. बोलता बोलता तो चटकन् बोलून गेला 'सर, भोवतीची मुलं पाहून केव्हातरी मलाही थोडी झापड आल्यासारखं होतं.'
'मग अशा वेळी?'
'मी... मी फक्त आईचे डोळे आठवतो.'
'अं?'
'राब राब राबायची ती. कागदाच्या पिशव्या करीत. गोंदकात्र्या घेऊन आम्ही तिच्याभोवती बसून मदत करायचो. वडिलांची गिरणी संपानंतर संपलीच. त्यानंतरचा वनवास. शेवटी ती बोलत राहायची. 'मी काही आता जगत नाही; पण तुझ्याकडे माझे डोळे कायमचे असतील. तू कसा शिकतोस, मोठा होतोस, ते पाहण्यासाठी... सर, ते डोळेच आठवतात हो!'
रिक्षात बसलो तेव्हा हेच आठवत राहिलं.
सतत कुणीतरी सांगावंच का लागतं? अभ्यास करा, कष्ट करा, लवकर उठा... पालक किती मर मर मरतात. आपल्यासाठी! याची आतून जाण असणारा असा एखाद्‌दुसराच!
परवा एक शिक्षिका असलेली पालक आई स्टाफरूममध्ये विषण्ण चेहऱ्याने आली. 'मुलगा सकाळी उठतच नाही हो. सातचं लेक्चर नेहमी बुडवतो. ऐकतच नाही. आता म्हणतो, शिकायचंच नाही. काही करायचं नाही. कुणाचं मुळी ऐकतच नाही.' फक्त रडायचं बाकी होती ती बाई.
तारुण्याचा खूप काही सुंदर घडवण्याचा ऋतू संपून गेल्यावर कितीतरी विद्यार्थी जागे होतात. तेव्हा उशीर झालेला असतो. एक भकास दुपार... आणि निराश संध्याकाळ!
सकाळी उठण्यासाठी 'कंपल्शन'. कॉलेजला जाण्यासाठी 'कंपल्शन'. मग शिकण्यासाठी, परीक्षेसाठी, त्याआधी वर्गात हजर राहण्यासाठी 'कंपल्शन'.
जबरदस्तीनं कधी फूल उमलतं का? रोपानं स्वत:हूनच आतून ठरवलेलं असतं. विद्यार्थ्यानं आतून ठरवायला हवं.
आईचे, बाबांचे डोळे आठवण्यासाठी ते प्रत्यक्ष मरायलाच हवेत का?
आपण वर्गात गुंडगिरी करताना किंवा वाह्यात वेळ घालवताना, चाचणीत शून्य मार्क मिळवताना... चर्चगेटहून लोकलमधून लोंबकळत येणारी आई आठवत नाही? मुलांसाठीच पैसे जमा करायला. सारख्या मद्रास कलकत्ता हैद्राबाद अशा कंपनीच्या वाऱ्या करणारे, थकलेले बाबा आठवत नाहीत?
घरात लहान असू; पण जाणीवेनं थोडं समजूतदार झालं तर पालकांच्या घामाचं गुलाबपाणी होऊ शकतं.
यशाची राईसप्लेट रेडीमेड मिळत नाही, हे आत्ताच कळायला हवं. यश शिजत ठेवावं लागतं. परिस्थितीच्या धगीनं, कधी महत्त्वाकांक्षेच्या इंधनानं आयुष्य उकळत ठेवावं लागतं. हे केव्हा कळणार?
चाळीसाव्या वर्षी?
एसेस्सीला फॉर्म भरायला पैसे नव्हते ते सलीलकडे पाहताना आठवून गेलं. आईच्या हातातली शेवटची सोन्याची बांगडी गहाण टाकण्यासाठी तीही कधीच न मिळण्यासाठी निघालेले माझे वडील आठवले.
आई म्हणाली 'ही शेवटची. पुढे काय?'
अजूनही घरातले ते क्षण आठवताहेत. नातेवाईकांनी केलेली उपेक्षा आठवली. निष्कांचन आईला पुढे येऊ न देणारे नातेवाईक आठवले. कुणाच्या तरी लग्नात 'माझी बोरमाळ तू घाल थोडा वेळ' अगदीच काळी पोत बरी दिसत नाही असं आईला म्हटल्यावर 'माझी लाज वाटत असेल तर मी येणार नाही. आले तर जशी आहे तश्शी येईन' हे बाणेदारपणे सुनावणारी आई आठवली.

आणि नंतर ती म्हणाली होती 'माझा दागिना बघायचा असेल, तर माझा मुलगा पाहा' त्या वाक्याने केवढी जबाबदारी टाकली आपल्यावर ते आठवलं.

असे प्रसंगच झपाटून शिकणाऱ्या मुलांच्या आयुष्यात निरंजन होऊन येतात. दारिद्र्य माणसाला संपवू शकत नाही. पण आळस, उदासीनता, ध्येयशून्यता पार नेस्तनाबूत करते माणसाला. मला दिलेल्या एका मुलाखतीतलं आशा भोसले यांचं वाक्य आठवलं 'सुखी माणूस कधी कलावंत होऊच शकत नाही.' खूप काही प्रेरणा देणारी ही रसरसलेली आयुष्यं तेव्हाच घडतात, आकाराला येतात; जेव्हा जगाच्या पाठीवर आपण कुठेही असलो तरी आपल्याला आठवत असतात कष्टाळू, अपार विश्वासाने कर्तृत्वासाठी जगात ज्यांनी पाठविलं आहे, असे आपल्यासाठी स्वप्न पाहणारे आईचे डोळे! आपल्या आईचे डोळे!!